# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

## फोटो ऑफ द विक स्पर्धा

शैक्षणिक वर्ष २०२४–२०२५ पासून शिवाजी विद्यापीठामार्फत **फोटो ऑफ द विक** हि स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. सदरची स्पर्धा ही शिवाजी विद्यापीठ अधिविभागामध्ये प्रवेशित विद्यार्थी–विद्यार्थिनी, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्याकरिता आयोजित केली आहे. सदरची स्पर्धा ही ऑनलाईन स्वरुपात विद्यापीठ पोर्टलमध्ये घेण्यात येणार आहे. तरी, सदर स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी–विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग नोंदवावा.

**स्पर्धेची नियमावली :**

१. सदर स्पर्धेत शिवाजी विद्यापीठात शिकणारे विद्यार्थी–विद्यार्थिनी आणि शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी सहभागी होऊ शकतील.
२. सहभागी स्पर्धकाला दर आठवड्यात जास्तीत जास्त २ छायाचित्रे अपलोड करता येऊ शकतील.
३. छायाचित्रे शिवाजी विद्यापीठ परिसरातीलच असावीत. (आवश्यक तेथे जिओ–टॅगिंग करावे.)
४. विद्यापीठ परिसर येथील निसर्ग व पशुपक्षी यांची व तद–अनुषंगिक छायाचित्रे असावीत. **सेल्फी अथवा व्यक्तीकेंद्रीत छायाचित्रे अपलोड करु नयेत.**
५. छायाचित्रे 10 MB पेक्षा मोठ्या आकाराची असू नयेत. तसेच ती लॅंडस्केप स्वरुपातील व JPG/JPEG फॉरमॅटमधील असावीत.
६. छायाचित्रे मूळ स्वरुपात सादर करावीत. संपादित स्वरुपातील असू नयेत.
७. छायाचित्र निवडीचे अधिकार विद्यापीठाने स्वत:कडे राखून ठेवले आहेत.
८. दिशाभूल करणारी, चुकीची माहिती देणाऱ्या स्पर्धकांवर शिस्तभंग कारवाईचे अधिकार विद्यापीठ स्वत:कडे राखून ठेवीत आहेत.
९. स्पर्धेसाठी सादर केलेल्या आणि निवडलेल्या छायाचित्रांचे सर्व अधिकार विद्यापीठाकडे राहतील. सदर स्पर्धेखेरीजही त्या छायाचित्रांचा वापर करण्याचा अधिकार विद्यापीठास राहील.
१०. सदर स्पर्धेचे परीक्षक व स्पर्धा आयोजनाशी संबंधित घटकांना स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.

**बक्षीस :**

१. सर्वोत्कृष्ट छायाचित्रास विशेष प्रमाणपत्र देण्यात येईल.
२. सर्वोत्कृष्ट छायाचित्र शिवाजी विद्यापीठाच्या वेबसाईटवर स्पर्धेकाच्या नावासह प्रसिद्ध करण्यात येईल.

**रजिस्ट्रेशन लिंक : विद्यार्थ्यांसाठी लिंक : https://sukapps.unishivaji.ac.in/pgentrance/#/login**
**शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी लिंक : https://sukapps.unishivaji.ac.in/onlineaffiliation/#/login**

**अधिक माहितीसाठी संपर्क:** १. जनसंपर्क कार्यलय – ०२३१–२६०९१४३
२. संगणक केंद्र – ०२३१–२६०९३७८

संदर्भ क्रं. शिवाजीवि/विद्यार्थी विकास/१३५
दिनांक : ०५/०८/२०२४

संचालक
विद्यार्थी विकास

१. सर्व पदव्युत्तर अधिविभागप्रमुखांनी सदरचे परिपत्रक आपल्या अधिविभागातील सर्व शिक्षक, विद्यार्थी/विद्यार्थिनींना व प्रशासकीय सेवक यांच्या निदर्शनास अणावे व स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रेरीत करावे.
२. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहा. कुलसचिव व समकक्ष अधिकारी
३. सर्व प्रशासकीय विभागप्रमुखांनी आपल्या विभागातील सर्व सेवक यांच्या निदर्शनास अणावे व स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रेरीत करावे.
४. मा. कुलगुरु, मा. प्र–कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. वित्त व लेखा अधिकारी, मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांच्या कार्यालयास माहितीसाठी
५. नोटीस बोर्डवर लावणेसाठी –
१) मुलींचे वसतिगृह क्र. १, २ व ३ — २) मुलांचे वसतिगृह क्र. १, २ व ३
३) डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन — ४) बॅरीस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय.
५) डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थीनी भवन — ६) तंत्रज्ञान विद्यार्थी व विद्यार्थीनी वसतिगृह
६. इंटरनेट सेल – सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

**टिप : सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व अधिकारी व प्रशासकीय सेवक यांच्या निदर्शनास आणावे.**